ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

# कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,

## शिवाजीनगर गढी

## बी.ए.प्रथम वर्ष - पेपर III

## विषय :- ललितगंध

प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)

मराठी विभाग

# ललितगंध

मराठी साहित्यामध्ये ललितगद्य हा महत्वचा वाङ्मय प्रकार आहे. ललितगद्य हा शब्द 1970 नंतर वापरात आला. ललितगद्यास मराठीत विविध नावांनी संबोधले गेले. निबंध, लघुनिबंध ते मुक्तगद्य असा त्याचा प्रवास चालत आला. कथा, कविता, कादंबरी व नाटक या वाङ्मय प्रकारांपेक्षा ललितगद्य हा वेगळया स्वरुपाचा वाङ्मय प्रकार आहे. ललितगद्य हा कथनात्मक साहित्य प्रकार असला तरी यातील कथनाचे स्वरुप हे अन्य कथनात्मक वाङ्मय प्रकारापेक्षा वेगळे ठरते. ते त्याच्यातील आविष्कारभिन्नतेमुळे. ललितगद्यात विषयाचे स्वातंत्र्य असते. मी ला केंद्रिय स्थान असते.

ललितगद्य या  वाङ्मय प्रकाराचे स्वरुप ह मुक्त आणि प्रसरणशील राहिले आहे. काळाच्या टप्प्यावर ललितगद्याचा बहुमुखी विस्तार झाला.

विशेष - 1. आत्मपरता

2. अनौपचारिकता

3. व्यक्तिचित्रणात्मक लेखन

4. पारंपरिक कल्पनांचा अभाव

5. चिंतनगर्भ वैचारिकता




❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## ❖ बा शेतक-या ऊठ ! - साने गुरुजी (1899 ते 1950 )

साने गुरुजी हे मराठीतले एक श्रेष्ठ गांधीवादी शिक्षक, समाजसुधारक आणि प्रतिभावंत लेखक होते. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता. वेगवेगळया चळवळीत सहभाग घेतला.राष्ट् सेवा दलाची स्थापना केली. वेगवेगळया मासिकातून , साप्ताहिकातून लेखन करत असत. कथा, कादंब-या, लेख,निबंध, चरित्रलेख कविता यांमधून त्यांच्यातील संवेदनशील साहित्यिकही आपल्याला दिसतो.

साने गुरुजी यांनी हा ललित लेख शेतक-यांच्या स्थितीवर व त्यांच्या संघटितपणावर हा निबंध प्रकाश टाकतो. शहरे आणि खेडी, मध्यमवर्ग आणि शेतकरी यांच्यातील तुलना या लेखात आहे. प्रत्यक्ष खेडयात जाऊन शेतक-यांची स्थिती पाहावी म्हणजे त्यांच्या दुरावस्थेची जाणीव होऊन तो कोणावरही अवलंबून राहू नकोस तुझी स्वत:ची संघटना कर असे साने गुरुजी यांनी या लेखात सांगितले आहे.





❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## गांधी आमचा कोण लागतो ?- अनंत भालेराव

अनंत भालेराव यांनी या लेखात महात्मा गांधी यांच्या असामान्य थोरवी व गुणांबद्दल लिहिले आहे. या लेखात म.गांधी यांच्या स्वातंत्र्याच्या व्यक्तिगत आठवणी सांगितल्या आहेत. उमरी बँकवर हल्ला करून स्वातंत्र्यासाठीची लूठ घेऊन जाताना गांधी खुनाची बातमी लेखकाला समजते. त्यावेळीची समाजस्तब्धता त्यांनी सांगितली आहे. जीवनातले काहीतरी मूल्यवान नाहीसे झाल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण होते. त्यावेळी त्यांच्या मनात जे विचार स्फुरले ते या लेखात निवेदिले आहे.




❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## महाविद्यालयातील विद्यार्थ्यास पत्र - शरद जोशी

शरद जोशी यांनी या लेखात शेतक-यांच्या प्रश्नांविषयी कळवळा आणि शेतीमालाच्या भावाविषयी संघटित लढा शरद जोशी यांनी उभा केला. खेडयातील शेतक-याचा मुलगा शहरात शिक्षणसाठी येतो त्याला उद्देशून पत्रात्मक लेख शरद जोशी यांनी लिहिला आहे. ग्रामीण भागातील अडचणी, दारिद्रय, सुखसोयींचा अभाव या पार्श्वभूमीवर या मुलांनी शिकावे असा शरद जोशी यांचा आग्रह आहे. गरिबी आणि श्रीमंती, शहरे आणि खेडे यातली तफावत, भेदाचे कथन या लेखात आहे. शहरे आणि श्रीमंत वर्ग शेतक-यांचे शोषण करतात, याबद्दलचा विचार या लेखात आहे. शेतक-यांच्या हक्काची सजग जाणीव तरुण पिढीमध्ये व्हावी असा विचार त्यांनी मांडला आहे.

ग्रामीण भागातील तरुण विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरावे असे विचार या लेखात आहेत. न्यूनगंड,नाउमेद न होता ग्रामीण तरुणांनी आत्मविश्वासाने उभं राहायला हवं, असा सकारात्मक विचार लेखात आहे.



❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## यशवंतरव : साधे, सुसंस्कृत, मायाळू - अनिल अवचट

अनिल अवचट यांनी या लेखात महाराष्टातील थोर नेते यशवंतराव चव्हाण यांच्याविषयीच्या आठवणी व स्वभावविशेष नोंदवले आहेत. व्यक्तिचित्रणात्मक स्वरुपाचा हा लेख आहे. यशवंतराव चव्हाण यांच्य ह्दय मायाळूपणाच्या आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. यशवंतरावांच्या भेटी साहित्याबद्दलचे प्रेमआस्था व माणसामाणसातील ऋजुतेविषयी त्यांनी लिहिले आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या राजकारणातील भूमिकांबद्दल काही मंडळी वेगळा नकारार्थी विचार मांडतात. त्या पार्श्वभूमीवर अवचट यांनी लेखाचा शेवट केला आहे.







❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

## सुभाष सानपची गोष्ट्र - नागनाथ कोत्तापल्ले

या लेखात कोत्तापल्ले यांनी आधुनिक काळातील एका विदारक प्रश्नावर प्रकाश टाकला आहे. सुशिक्षित तरुण पिढीचा भ्रमनिरासा आणि त्यातून आलेल्या हतबलतेचे चित्र लेखाल आहे. शैक्षणिक गुणवत्ता असूनही नाकरी न मिळणा-या पिढीच्या हतबल स्थितीचे चित्र या ललित लेखात आहे. ख-या अर्थाने आधुनिक काळातील शैक्षणिक, सामाजिक दुविधेचे चित्र या लेखाद्वारे त्यांनी मांडले आहे.



❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग

# धन्यवाद

❖प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक) मराठी विभाग